**CNR : MHST05000314-2019**

**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. २१९/२०१९</u>**

अरूण बळवंत मोहिते वगैरे ..... **वादी**

**वि.**

महाराष्ट्र सरकार वगैरे ..... **प्रतिवादी**

**<u>नि. ३४ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द होणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकिलांचे निवेदन असे की, सदर कामी काही कार्यालयीन कामामुळे कैफियत वेळेवर देता आली नाही व त्यामुळे प्रतिवादीविरुध्द विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश झाला आहे. दावा गुणावगुणावर चालणेसाठी प्रतिवादीविरुध्द झालेला सदरचा आदेश रद्द होवून त्यांना कैफियत दाखल करणेची परवानगी मिळावी. वादीच्या वकीलांचे निवेदन असे की, प्रतिवादी नं.१ चा सदरचा अर्ज बेकायदेशीर व खोटा आहे. मे. कोर्टाने नि.५वर ता. १३/६/२०१९ रोजी स्टेटसकोचा आदेश केला असून तो आजपर्यंत कायम केला आहे. त्यानंतर नि.५ चे सुनावणी कामी दोन तारखा झालेल्या आहेत. त्यावेळी प्रतिवादी अथवा त्यांचे वकील हजर नव्हते. आजरोजी मे. कोर्टाने नि.५ वर आदेश करणेसाठी आजरोजी तारीख नेमणेत आली होती. प्रस्तुतचा अर्ज केवळ दावा प्रलंबित ठेवणेचे हेतुने दाखल केला आहे तरी तो खर्चासह रद्द करण्यात यावा.

४. प्रतिवादीचा अर्ज व त्यावर वादीने दिलेले म्हणणे व युक्तिवादातील केलेली कथने विचारात घेता तसेच प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी केलेला असल्याने

त्यासंबंधीचा पुरावा न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द केल्यास व प्रतिवादीला कैफियत देणेची संधी दिल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.१ यांचे विरुद्ध विनाकैफियत दावा चालविण्याचा झालेला आदेश रद्द केला आहे.

(न्यायासनावर अधिघोषीत केले)

Prasad Anant Savadikar
Digitally signed by Prasad Anant Savadikar
Date: 2019.08.14 11:48:35 +0530

कराड. (प्र. अ. सवदीकर)
दि. १३/०८/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड